# समाजसुधारक : श्रीनरसोबा

‘तसं म्हटलं तर

गाभाऱ्याचंच महत्त्व अंतिम असतं

गाभारा सलामत

तो देव पचास’ ----- (कुसुमाग्रज)

कै. तात्यासाहेब शिरवाडकर यांनी त्यांच्या ‘गाभारा’ कवितेत व्यक्त केलेल्या भावना श्रीगुरु नृसिंहसरस्वती अर्थात जनसामान्यांचे श्रीनरसोबा ‘अध्याय १९’ मधील कथेत व्यक्त करताना दिसतात. समाजाला प्रगती पथावर नेणारे श्रीगुरु आपल्या पादुका ६४ योगिनींच्या स्वाधीन करताना, त्या योगिनींना संदेश देतात, “ह्या पादुकांची पूजा करायला पुरुष येतील. त्यांना तुम्ही मदत करा.” योगिनी म्हणजे जोगिणी,जोग्याची बायको असा अर्थ शब्दकोशात आहे. श्रीगुरु पुढे सांगतात, “अन्नपुर्णेबरोबर तुमच्यावर लोक अभिषेक करतील”. (ओवी क्रमांक ८०,८१)

श्रीगुरुंनी वर्तविलेले अनुमान आजच्या युगात आपण शब्दशः अनुभवितो. नरसोबाची वाडी (जिल्हा सांगली) ह्या तीर्थक्षेत्री श्रीगुरुंच्या पादुकांचे आपण श्रद्धेने दर्शन घेतो, तसेच अमरेश्वर मंदिरांत ६४ योगिनींपुढे नतमस्तक होतो. ह्याचा अर्थ गाभाऱ्याचे व त्यात प्रतिष्ठापना केलेल्या देवांचे महत्त्व

दिवसेंदिवस वाढत चालले आहे. परंतु गाभाऱ्यातील श्रीगुरु व त्यांच्या ६४ उत्तराधिकारी महिला शिष्य वर्गाच्या कार्याचा गाभा, आजही आपल्याला अज्ञात आहे.

'श्रीगुरुंनी नरसोबावाडी ह्या तीर्थक्षेत्रांत सुमारे साडे पाचशे वर्षांपूर्वी कशा पद्धतीने कार्य केले ?' हे श्रीगुरुंच्या कथारुपी इतिहासातून आपल्याला समजू शकत नाही. कोणत्याही घटनेचा, व्यक्तीचा 'इतिहास' हा बहुतांशी एकांगी असतो. कारण इतिहास लिहिणाऱ्या व्यक्तीला तो ज्या पद्धतीने समजतो, तसा तो आपल्याला कथा,लेख,बखर,शिलालेख इत्यादि माध्यमांतून सांगत असतो. इतिहासाची मीमांसा करणाऱ्याच्याही मर्यादा, त्या ऐतिहासिक गोष्टींच्या आकलनावर पडतात.

श्रीगुरुचरित्रकारांनी त्यांना समजलेला श्रीगुरुंचा इतिहास प्रचलित कथेमध्ये बदल न करता भावी पिढ्यांच्या हवाली केलेला आहे (ओवी क्रमांक ७).त्यामुळे श्रीगुरुंचे विचार पारदर्शीपणे आपल्यापर्यंत पोहोचतात. पिढांपिढ्या ह्या कथांमध्ये आलेल्या अद्‌भूत गोष्टींचा बाऊ न करता दत्तभक्त श्रीगुरुचरित्राची श्रद्धेने पारायणे करतात.

श्रीगुरु पंचगंगासंगमावर सुमारे १२ वर्षे म्हणजे एक तप वास्तव्य करुन होते. पंचगंगा नदी व कृष्णा नदी ह्या नद्यांच्या संगमित नदीक्षेत्राला

साडे पाचशे वर्षांपूर्वी ‘पंचगंगासंगम’ म्हणत असत. ह्या पंचगंगासंगमावर असलेल्या औदुंबराच्या छायेत श्रीगुरु रहात असत. (ओवी क्रमांक २७)

समाजातील अनाचारचे प्रदूषण दूर करताना, मनुष्यवस्तीने निसर्गास हानी होऊ नये, ही काळजी श्रीगुरु घेताना दिसतात. अध्याय १५ मध्ये आपल्या शिष्यांना भारतभर तीर्थयात्रेसाठी पाठविताना, श्रीगुरुंनी भारतवर्षातील जल संपत्ती व तिचे संगोपन ह्याची सविस्तर माहिती शिष्यांना सांगितलेली आहे. शिष्यांना सांगितलेल्या नियमांचे ‘श्रीगुरु’ स्वतः काटेकोर पालन करताना दिसतात. श्रीगुरु रहात असलेला औदुंबर वृक्ष हा नदीच्या एका तीरावर आहे. रोज दुपारी नदी ओलांडून, श्रीगुरु अमरेश्वराजवळील जंगलात जात असत; (ओवी क्रमांक ३३,३४,३५) ह्याचा अर्थ श्रीगुरुंचे कार्य नदीच्या दोन्ही तीरांवर विस्तारत असावे.

श्रीगुरुंचे कायमचे वसतीस्थान असलेला औदुंबर (उंबर) वृक्ष पाणीसाठा असलेल्या जमिनीत उगविताना आढळतो. जीवन जगण्यासाठी पाण्याची गरज श्रीगुरुंच्या वास्तव्यातून अधोरेखित होते. उष्णतेचा दाह शांत करणाऱ्या उंबराची फळे आरोग्यास उत्तम असतात, तसेच औदुंबर वृक्षाचा चीक कुष्ठ रोगावर औषध आहे, असा ह्या कथेतून बोध होतो(ओवी क्रमांक ९३). ‘उंबराची फळे खाल्याने शरीरास होणारा फायदा, तसेच कोणत्या ऋतूत ही फळे

खावीत ?’ ही माहिती आयुर्वेद देऊ शकेल.  वैद्यक शास्त्राने ‘उंबराच्या झाडाचा चीक कुष्ठ रोगावर औषध आहे किंवा नाही ?’ हे संशोधित करणे काळाची गरज आहे. औदुंबर वृक्षाच्या  चीकातील कोणता घटक कुष्ठ रोगावर उपयोगी आहे ? व त्याचा कशाप्रकारे उपयोग करता येईल ? हे झाले भविष्यकालीन प्रश्न !

औदुंबराच्या झाडाला दोन-चार फेऱ्या घालून नमस्कार केल्यास त्याचा उपयोग होत नाही, असे कथाकार सांगतात.

शनी ह्या मंद ग्रहाच्या गतीप्रमाणे प्रदक्षिणा घालावी असे श्रीगुरुचरित्रांत सांगितलेले आहे. (ओवी क्रमांक ९१)

सोमसूर्य ग्रहण काळांत तसेच व्यतिपात योगात पंचगंगा संगमात स्नान करावे,असे कथेत सांगितलेले आहे (ओवी क्रमांक ८६).

सूर्य व पृथ्वी ह्यांच्या मध्ये सोम म्हणजे चंद्र आल्यास, खग्रास सूर्य ग्रहण होते. सुमारे साडे सात हजार वर्षांपूर्वी, श्रीअत्रीऋषींनी (श्रीगुरुदेव दत्तात्रेयांचे पिता) चित्रकुट पर्वतावरुन पाहिलेल्या सूर्य ग्रहणाची नोंद, लोकमान्य टिळकांच्या ओरायन पुस्तकात वाचावयास मिळते. श्रीअत्रीऋषींमधील खगोलशास्त्रज्ञ ग्रहणाच्या नोंदी करतो, ह्या उल्लेखावरुन ‘ग्रहणकाळांत नदीत स्नान करावे ?’ ही रुढी कोणत्या शतकापासून सुरु झालेली असावी !

सूर्यग्रहणाप्रमाणे व्यतिपात ही खगोलीय घटना नसून खगोलगणितातील काल्पनिक समीकरण आहे. ‘सूर्य व चंद्र यांचा योग मोजणे’ ही प्रथा साधारण इसवी सन ५०० पासून सुरु झालेली असावी असे संशोधक सांगतात, म्हणजे इसवी सन ५०० पूर्वीच्या ज्योतिषशास्त्रात जन्मकुंडलीत दिसणारे २७ योग नसावेत.(www.ketkardnyankosh.com)

व्यतिपात योग =वि +अति + पात (ज्योतिष शास्त्रीय अर्थ ग्रहाचा उतरता पात= दोष)

{ ज्योतिष शास्त्रातील अशुभ योग}

खगोलीय गणितानुसार पृथ्वी हा केंद्र बिंदू कल्पून

सूर्य रेखांश + चंद्र रेखांश = योग

व्यतिपात योग तसेच सूर्यग्रहण ह्यावेळी नदीत स्नान करावे ही श्रीगुरुंची शिकवण आहे ? की जनमानसात रुजलेली प्रथा आहे ? श्रीगुरुं रोज दुपारी अमरेश्वराजवळील जंगलात जाउन काय करतात ? हे कुतुहल गावातील ब्राह्मणांमध्ये आहे. ह्याचा अर्थ अरण्यवासी लोकांना कथित अशुभ वेळी श्रीगुरु पंचगंगा संगमात स्नान करण्यासाठी घेऊन आलेले दिसत नाहीत.

नदी किनारी राहणाऱ्या गंगानुज याला दिसलेले नदीतळातील अद्भूत नगर हा कल्पना विलास असावा. (ओवी क्रमांक ४६ ते ५०) श्रीगुरुंनी गाणगापूरकडे प्रस्थान करण्याचे ठरविले, तेव्हा ६४ योगिनी त्यांना

भेटायला आल्या (ओवी क्रमांक ७४).परंतु अद्भूत नगरातील नगरवासी आलेले दिसत नाहीत. लोकवाङमयातून आलेल्या अद्भूतेला ऐतिहासिक पुरावा म्हणता येणार नाही.

श्रीगुरुंनी गंगानुजास मनोवेगाने काशी,प्रयाग,गया ह्या त्रिस्थळांचे दर्शन दिले, असा कथेत उल्लेख आहे(ओवी क्रमांक ६९ ते ७१) मनोव्यापाराचे शास्त्र जो पर्यंत प्रयोगाने सिद्ध होत नाही, तो पर्यंत ह्या गोष्टीला अनाकलनीय सदरात ठेवावे लागेल. विद्युत लहरींच्या सहाय्याने मेंदूंचे संदेशवहन सध्या प्रयोगाने सिद्ध झालेले आहे. घटना स्थळी हजर नसताना, मनःचक्षूने घडत असलेली घटना मला स्वतःला दिसलेली आहे, त्याची शास्त्रीय कारणमीमांसा आजही मला सांगता येत नाही.

श्रीगुरुंनी गंगानुजास सांगितले की जुग्गुळ म्हणजे काशी कोल्हापूर म्हणजे गया व पंचगंगासंगम म्हणजे प्रयाग होय(ओवी क्रमांक ६७,६८).

| | |
|---|---|
| जुग्गुळ | चालुक्य राजवटीतील (७ वे शतक) जुग्गुळ येथील कोपेश्वर मंदिरात शिवशंकर व श्रीविष्णु हे ह्या दोन्ही देवांची जोडी शिवलिंग व विष्णुलिंग स्वरुपात आहेत. |
| काशी | काशीक्षेत्री शिवशंकर ज्योतिर्लिंग स्वरुपात आहेत. |

| | |
|---|---|
| कोल्हापूर | कोल्हापुरमध्ये श्रीविष्णु व श्रीमहालक्ष्मी यांचे कायमस्वरुपी वास्तव्य आहे. ह्या श्रद्धेनुसार महाप्रलय समयी श्रीविष्णु व श्रीमहालक्ष्मी कोल्हापुर (प्राचीन नाव करवीर ) नगर सोडून जाणार नाहीत. |
| गया | वायु पुराणातील संदर्भानुसार, गयासूर ह्या अत्यंत धार्मिक असूराला श्रीविष्णुनी दिलेल्या वरामुळे गया क्षेत्र गयासुराच्या मृत शरीरापासून निर्माण झालेले आहे. |

| | |
|---|---|
| पंचगंगासंगम | शिवा, भद्रा, भोगावती, कुंभीनदी, गुप्त सरस्वती (श्रद्धा)<br>अशा पाच नद्यांच्या संगमातून तयार झालेली पंचगंगा नदी, कृष्णा - वेणी नदीशी संगमित होते.<br>कृष्णा - वेणी =कृष्णा नदीची प्राचीन काळी ‘वेणी’ ही उपनदी होती ? की नदी संगमात कृष्णा नदीची इतर नद्यांशी वेणी घातली जाते ?<br>(संदर्भ : श्रीगुरुचरित्र अध्याय १८ -ओवी क्रमांक १६, ३२) |
| प्रयाग | पंचनद् भागातून रुपात येणारी गुप्त सरस्वती (श्रद्धा), गंगा, यमुना अशा तीन नद्यांची वेणी होत असल्याने, प्रयाग स्थानास ‘त्रिवेणी’ संगम असे नाव आहे. |

आपल्या आजूबाजूच्या निसर्गात तीर्थस्थळे पहाण्यास शिकविणारे श्रीगुरुंचे तत्वज्ञान आज आपण खरोखरच विसरलेलो आहोत. फक्त श्रीगुरुंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पंचगंगा संगमास नरसोबाची वाडी हे नामकरण करुन श्रीगुरुंच्या पादुका ठेवलेल्या गाभाऱ्यापर्यंत भक्तीभावाने पोहोचतो.

गंगानुजास जवळ करणारे श्रीगुरु जातीभेद न मानणारे असावेत. {नदीकाठी राहणारा गंगानुज त्यांचा भक्त बनतो.}

६४ योगिनींच्या हाती आपल्या पादुका सोपविणाऱ्या श्रीगुरुंनी महिलांना आपले उत्तराधिकारी नेमलेले दिसते. {अरण्यातील ६४ योगिंनींकडे रोज दुपारी ते जेवण करतात.}

१२ वर्षे अथक कार्य करणाऱ्या श्रीगुरुंविषयी गावातील ब्राह्मणांमध्ये कुतुहल निर्माण होते.

ह्या घटनांवरुन 'श्रीगुरु' निश्चित अदृश्य किंवा भूमीगत रुपात १२ वर्षे कार्य करित नसावे, त्यांचे कार्य लोकांमध्ये प्रकटपणे चालू असावे,असे दर्शवितात.

जातीभेद,लिंगभेद न मानणाऱ्या श्रीगुरुंनी निसर्गातील पाण्याचे महत्त्व अधोरेखित केलेले दिसते.

'श्रीगुरुंच्या विचारांचा गाभा  समाजमनांत रुजावा', ही श्रीगुरुचरणी प्रार्थना.

॥ जय गुरुदेवदत्त ॥